# श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान

## *महाशिवरात्री*

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

### परिचय

सिद्धयोग मार्गावर, आपल्याला ‘ॐ नमः शिवाय’ या मंत्राचा जप करणे खूप आवडते. खरे आहे ना? आणि ‘मांगल्य को बढ़ाओ, महाशिवरात्रि का उत्सव मनाओ’, या सिद्धयोग सत्संगात सहभागी होण्याचे आमंत्रण मिळताच आपण आणखी जोमाने मंत्रजप करायला सुरुवात केली.

हा सत्संग महाशिवरात्रीला, म्हणजेच १५ फेब्रुवारी, २०२६ रोजी, सिद्धयोग वैश्विक हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. श्री मुक्तानंद आश्रमाच्या भगवान नित्यानंद मंदिरातून या सत्संगाचे थेट व्हिडिओ प्रसारण झाले. महाशिवरात्री हे पर्व रात्री जागरण करून साजरे केले जाणारे पर्व असल्यामुळे न्यूयॉर्क वेळेनुसार हा सत्संग संध्याकाळी झाला. मी असे ऐकले की, सत्संगाची ही वेळ असल्यामुळे अनेक देशांमधील लोक *अतिशय खूश* झाले होते, कारण याचा अर्थ हा होता की, डोळे पूर्ण उघडे ठेवून आणि संपूर्ण एकाग्रतेने ते या सत्संगात सहभागी होऊ शकणार होते. *तुम्हाला माहीतच आहे की, तुम्ही कोण आहात!*

सत्संगादरम्यान, श्री जूलियन एल्फर यांनी सूत्रधार म्हणून सेवा अर्पण केली. ते एक सिद्धयोगी असून न्यूयॉर्कमध्ये एक अभिनेता तसेच ऑडिओ बुक वाचक म्हणजे नॅरेटर म्हणून कार्यरत आहेत. तुमच्यापैकी अनेक लोकांनी मला नंतर सांगितले की, श्री जूलियन यांनी ज्या प्रकारे सत्संगाचे सूत्रसंचालन केले त्यात तुम्हाला किती स्पष्टता आणि आपुलकी जाणवली. श्री जूलियन यांनी महाशिवरात्रीचे महत्त्व आणि या रात्री सिद्धयोग परंपरेचा मंत्र ‘ॐ नमः शिवाय’चे गायन करण्याच्या विशेष शक्तीविषयी सांगितले.

श्री जूलियन यांनी दिलेल्या सुस्पष्ट परिचयानंतर, आपण श्रीगुरुमाईंची वचने ऐकली. श्रीगुरुमाईंनी आपल्याला सांगितले की, मंत्रधुन सुरू करण्यापूर्वी रॉबिन जेन्सन या आपल्याला पवित्र बिल्वपत्राविषयी माहिती देतील—बिल्वपत्रे ही भगवान शिवाला, विशेषतः या रात्री अर्पण केली जातात.

रॉबिन जेन्सन या एक सिद्धयोगी आहेत ज्या कॅलिफोर्नियात राहतात. त्यांनी भावपूर्ण व स्पष्ट शब्दांत बिल्वपत्राचे महत्त्व सांगितले. त्यांनी आपल्याला हेदेखील सांगितले की, आपण बिल्वाष्टकम् स्तोत्र ऐकणार आहोत, जे महान ऋषी आदि शंकराचार्य यांच्याद्वारे रचित स्तोत्र आहे. रॉबिन यांनी समजावले की, ज्या चालीमध्ये या स्तोत्राचे गायन केले जाणार आहे, त्याची संगीतरचना श्रीगुरुमाईंनी केली आहे आणि मग त्यांनी आपल्याला संगीतमंडळीबरोबर ते पद गाण्यासाठी आमंत्रित केले, जे प्रत्येक श्लोकाच्या शेवटी येते : "एकबिल्वं शिवार्पणम्।" याचा अर्थ आहे, 'मी एक पवित्र बिल्वपत्र भगवान शिवाला अर्पण करतो.' [आपण हे शब्द गाण्याची पूर्वतयारी करून आलो होतो, कारण सत्संगाच्या आमंत्रणात आपल्याला हे शब्द पाठ करून येण्याविषयी सुचवले गेले होते.]

श्रीगुरुमाईंनी बिल्वाष्टकम्चे गायन केले. प्रत्येक श्लोकाच्या शेवटी संगीतमंडळीचे कंडक्टर, श्री कृष्ण हद्दाद यांनी आपल्याला संगीतमंडळीबरोबर "एकबिल्वं शिवार्पणम्" गाण्यासाठी मार्गदर्शन केले.

सत्संगानंतर काही दिवसांनी मी एका व्यक्तीबरोबर सेवा मीटिंगमध्ये होते आणि अर्थातच आम्हाला सत्संगातील आमच्या प्रिय क्षणांचे स्मरण करण्यासाठी थोडा वेळ द्यायचाच होता. मी ज्या व्यक्तीबरोबर मीटिंगमध्ये होते, त्यांनी मला त्यांचा अनुभव सांगितला. त्या म्हणाल्या की, ज्यावेळी श्रीगुरुमाई बिल्वाष्टकम् गात होत्या आणि भगवान शिवाची पूजा करत होत्या, त्यावेळी श्रीगुरुमाईंच्या सान्निध्यात *तिथे असणे* हे त्यांचे किती महान सद्भाग्य आहे, असे त्यांना वाटले. त्या सिद्धयोगीला अनुभव आला की, भगवंत, श्रीगुरू आणि आत्मा हे एकच आहेत. एकच ध्वनी वैश्विक हॉलमध्ये व्याप्त झाला होता. दैवी ऐक्याची अतिशय स्पष्ट अनुभूती होत होती.

आपण तर बिल्वाष्टकम्च्या सुंदरतेत आणि पावनतेमध्ये आधीच चिंब झालो होतो, आणि त्यानंतर आपण स्वतःला पावन ध्वनीमध्ये आणखी निमग्न केले. श्रीगुरुमाईंसोबत आपण राग भूपालीमध्ये दीक्षामंत्र 'ॐ नमः शिवाय'ची धुन गायली.

मंत्रधुन झाल्यानंतर अत्यंत गहन ध्यान झाले. आणि मग आपण ध्यानातून जेव्हा बाहेर आलो, तेव्हा आपण उभे राहून आपल्या श्रीगुरुदेवांची आरती केली. ध्यानात आपले डोळे बंद होते, तेव्हा आपण प्रकाश अनुभवला आणि आरतीच्या वेळी आपले डोळे उघडे होते, तेव्हा आपण आरतीची ज्योत पाहत होतो.

त्यानंतर आपण आपले स्थान ग्रहण केले, त्यावेळी आपल्या सर्वांचे हृदय कृतज्ञतेने ओसंडून वाहत होते. काही क्षण आपण तसेच बसून राहिलो, वैश्विक हॉलच्या चमचमणाऱ्या नीलमंडपाखाली. आपण

श्रीगुरुमाईंचे स्वरूप डोळ्यांत साठवून घेत होतो. विशेषतः या रात्री म्हणजे महाशिवरात्रीला श्रीगुरुमाईंच्या सान्निध्यात सत्संगात असण्यासाठी आपण किती कृतज्ञ होतो, हे व्यक्त करण्यास शब्दांची गरजच नव्हती. असे वाटत होते की, जणूकाही वातावरणात काहीतरी बदलले आहे, काहीतरी आणखी सतर्क झाले आहे, आणि अधिक ज्योतिर्मय झाले आहे. लक्ष एकवटून ऐकण्यास आपण सजग झालो होतो. माझ्याबाबतीत तर निश्चितच तसेच झाले होते. माझ्यासाठी तो क्षण सत्संगातील सर्वात रोमांचक क्षण असतो—जेव्हा श्रीगुरुमाई त्यांच्या शिकवणी प्रदान करणार असतात. एक सिद्धयोगी म्हणून मी माझे मन, माझी बुद्धी, माझे हृदय यांना कार्यरत करण्यासाठी तत्पर असते. आणि मग, मला जे प्राप्त झाले आहे, माझी जी समज आहे, ते माझ्या कौशल्याचा वापर करून शब्दांमध्ये व्यक्त करण्याची जी संधी मला मिळाली आहे, तिचा मी एक लेखिका म्हणून आनंद घेते.

मला खातरी आहे की, माझ्याप्रमाणेच तुम्हालादेखील वाटले असेल की, श्रीगुरुमाई थेट तुमच्याशीच बोलत आहेत. त्यांचे शब्द तुमच्यासाठीच आहेत. तुमच्या जीवनात या वेळी ते अतिशय नेमकेपणे लागू होत आहेत, तुम्ही जसा विचार करत होतात आणि ज्या परिस्थितींना सामोरे जात होतात, ते शब्द त्या सर्व गोष्टींना लागू होत होते.

या सत्संगात श्रीगुरुमाईंनी अनेक शिकवणी प्रदान केल्या आणि त्यांनी या शिकवणी अनेक प्रकारे दिल्या. मकरसंक्रांतीप्रीत्यर्थ झालेल्या सत्संगावर लिहिलेल्या माझ्या मागील लेखात म्हणजे 'श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान'मध्ये मी लिहिले होते की, श्रीगुरुमाई जे काही सांगतात आणि जे काही करतात, त्यातून त्या आपल्याला शिकवणी प्रदान करत असतात. श्रीगुरुमाईंच्या वचनांवर व्यक्तिगतरीत्या आणि सामूहिकरीत्या चिंतनमनन करण्याच्या महत्त्वाविषयीदेखील मी विस्तारपूर्वक लिहिले होते. साधनेमधील आपली प्रगती ही बऱ्याच प्रमाणात श्रीगुरूंच्या शिकवणींचा अर्थ स्वतःकरिता स्पष्ट करून घेण्याच्या व त्या समजून घेण्याच्या आपल्या क्षमतेवर निर्भर असते. जसे की, बाबा मुक्तानंद नेहमी सांगत असत, "एका साधकाला स्वतःच्या प्रयत्नानुरूपच शक्तीच्या विकासाची अनुभूती होते."

मला हे ऐकून खूप आनंद झाला की, तुमच्यापैकी अनेक लोकांना मकरसंक्रांतीच्या सत्संगातील श्रीगुरुमाईंच्या शिकवणींवरील माझे चिंतनमनन वाचणे आणि ऐकणे आवडले. उदाहरणार्थ, एका व्यक्तीने असे सांगितले की, जर 'श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान'च्या अंतर्गत हे लेख पोस्ट झाले नसते, तर कदाचित त्यांनी त्या विषयांचे अन्वेषण तशा प्रकारे केले नसते, जसे की, मी माझ्या लेखांमध्ये केले आहे. त्यांना वाटले की, विचार करण्यासाठी त्यांना एक नवा दृष्टिकोण मिळाला आहे. आपले अनुभव,

आपले चिंतनमनन एकमेकांना सांगण्यामध्ये हीच शक्ती आहे—आणि म्हणूनच मला माझे चिंतनमनन, माझे अनुभव सर्वांना सांगायला *खूप आवडते*. असे केल्याने आपण श्रीगुरूंच्या शिकवणी वेगवेगळ्या दृष्टिकोणातून समजून घेण्यास शिकतो.

श्रीगुरुमाईंच्या आज्ञेनुसार आणि त्यांच्या प्रोत्साहनामुळे, मला पुन्हा एकदा माझे चिंतनमनन तुम्हाला सांगण्याची सुंदर सेवा मिळाली आहे—यावेळी महाशिवरात्रीच्या सत्संगामध्ये श्रीगुरुमाईंनी प्रदान केलेल्या शिकवणींविषयी माझे चिंतनमनन लिहिण्याची सेवा. जसे की, मागील महिन्यात मी केले होते, या लेखशृंखलेसाठी केंद्रण करण्यासाठी विषय म्हणून मी सत्संगातील काही महत्त्वाचे मुद्दे निवडले आहेत. श्रीगुरुमाईंनी प्रदान केलेल्या शिकवणींवरील माझे अन्वेषण, संपूर्ण मार्च महिन्यादरम्यान, अनेक भागांमध्ये सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर पोस्ट केले जाईल.

मी तुम्हाला सांगू इच्छिते की, मकरसंक्रांतीच्या सत्संगावरील माझ्या लेखांविषयी तुम्ही जे अनुभव व चिंतनमनन लिहून पाठवले होते, ते सर्व मी वाचले आहेत. तुम्ही ज्या उत्साहाने, ज्या उत्कंठेने श्रीगुरुमाईंच्या शिकवणींवर कार्य केले, ते पाहून मी भारावून गेले. तुम्हाला यामुळे जर इतकी प्रेरणा मिळाली असेल, तर मी तुम्हाला आग्रह करेन की, तुम्ही 'श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान'च्या या नवीन शृंखलेसमवेतही तसेच करावे. श्रीगुरुमाईंच्या शिकवणींवरील तुमचे चिंतनमनन सर्वांना सांगा. त्या शिकवणींवरील माझ्या चिंतनमननाविषयीचे तुमचे विचार व्यक्त करा. मला असे वाटते की, हे एक प्रकारचे 'डिजिटल साधना सर्कल' आहे, जिथे आपण श्रीगुरुमाईंसोबत झालेल्या सत्संगानंतर एकत्र येतो आणि आपण जे शिकलो, ज्या विषयांवर आपल्याला प्रश्न आहेत, ज्या विषयाचे आपण अधिक अन्वेषण करू इच्छितो, त्या सर्व गोष्टींवर चर्चा करतो. सिद्धयोग मार्गाचे अनुसरण करण्यासाठी आपण अशाच प्रकारे एकमेकांना साहाय्य करतो. अशा प्रकारे, आपण नवीन साधकांकरता असे स्थानही तयार करतो, की ज्यायोगे, या अद्भुत मार्गावर वाटचाल करत असताना त्यांना जे अनुभव येत आहेत, त्यांविषयी त्यांना आपले विचार व आपल्या भावना व्यक्त करता याव्यात.

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.